ISSN NO. 2231-4058 (PRINT)

UGC Care Group -1 Journal

# भाषा आणि जीवन

(विशेषांक)

वर्ष— ३९ संख्या —०४

ऑक्टोबर — डिसेंबर २०२१



Scanned by CamScanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

# स्वातंत्र्योत्तर भारतातील 'शेतकरी आंदोलन '
# (1947–2000 इ.स.)

प्रा.नरेंद्र नरसिंग सुर्यवंशी
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे ,ता.पन्हाळा, जि.
कोल्हापूर.

प्रास्ताविक :–

भारतीय स्वातंत्र्योत्तर विविध प्रकारचे 'शेतकरी आंदोलने संपूर्ण देशात झाली. यामध्ये तेलंगणात 'शेतकरी आंदोलन , पेप्सू आंदोलन 1960 च्या दशकाच्या अखेरीस नक्षलवादी किंवा माओवादी आंदोलन 1980 च्या दशकातील नवीन 'शेतकरी आंदोलन इत्यादी याशिवाय याकाळात अनेक असे आंदोलने झाली.ज्याची माहिती प्राप्त होत नाही उदा. मध्यप्रदेश आणि बिहार मधील 1957–58 चे खारवाड आदिवासी आंदोलन महाराराष्ट्राच्या धुळे येथील 1967–75 चे भिल्ल आंदोलन 1978 पासून मार्क्सवादी जेसुइट प्रदीप प्रभुच्या नेतृत्वा तिल वरली संघर्ष इत्यादी. पंजाब आणि आंध्र प्रदेशमध्ये 'शेतक–यांची लेव्हीच्या विरोधात आंदोलन झाले. ही आंदोलने भारतीय स्वातंत्र्यानंतर कृषि आणि सामाजिक परिवर्तन प्रतिबिंबित करतात.

तेलंगांना शेतकरी आंदोलन –

कम्युनिस्टांनी हैद्राबादच्या निजाम विरोधात व एकीकरणाच्या समर्थनात सक्रिय सहभाग नोंदविला नालगांडा वारंगण आणि खम्मम जिल्हयात मोठा जनाधार त्यांनी तयार केला. कम्युनिस्टांनी 'शेतक–यांना संघटीत करुन 'दलम "बनविले मोठया संख्येने ग्रामीण भागात वर्चस्व त्यांनी निर्माण केले याचा पफायदा घेऊन त्यांनी भूमि संबंधात पुर्नसंगठन सुरु केले. भूस्वामिनी 1930 च्या दशकात आर्थिक मंदी मध्ये कर्जाच्या बदल्यात जमिनी हडप केल्या होत्या . या जमिनी मूळ मालकांना परत वापस करण्यात आल्या. सरकारच्या मालकीची उजाड आणि जंगलातील जमिनी भूमिहीनामध्ये वाटण्यात आल्या. भूमिहीन मजूरांचे वेतन वाढविण्यात आले ; एक वर्षाच्या वाट पाहणी नंतर भारतीय पफौजांनी 1948 मध्ये निजानाचा पराभव केला. 'शेतक–यांनी भारतीय फौजेचा उत्साह वाढविला परंतु या काळात कम्युनिस्टांनी सशस्त्र संघर्ष सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यांनी आपले आपले छापामार दस्ते नष्ट केले नाहीत. आपल्या समजुतीनुसार त्यांनी साम्राज्यवाद समर्थक भांडवलवादी भूस्वामी नेहरु सरकार च्या विरोधात मुक्ती युध्द सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला. या धोरणानुसार दलम किंवा छापामार गटांना जंगलात लपून भारतीय फौजावर हमले करण्याचे आदेश दिले गेले जसे ते रजाकारांवर करीत होते. परिणामस्वरुप एक अनावष्यक युध्द सुरु झाले याचे गंभीर व दुःखदायक परिणाम झाले. हजारो सामान्य 'शेतकःयांना मोठया संकटांचा सामना करावा लागला .जंगलातील लपलेल्या कम्युनिस्टांनी तेथील आदिवासींचा जनाधार मिळविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यात त्यांना यश मिळाले नाही. औपचारिकपणे आंदोलन 1951 मध्ये वापस घेण्यात आले.

सरकारने आंदोलनातील प्रश्नाकडे ताबडतोब लक्ष केंदित केले. 1949 मध्येच जहागीरदारी उच्चाटन कायदा केला गेला. 1950 मध्ये हैदराबाद कृषि भूमि कायदा संमत केला गेला. आंदोलनाच्या पतनानंतर परत आलेल्या जमिनदारांना त्या जमिनी परत दिल्या गेल्या नाहीत. त्यांनी शेतक–यांच्या जमिनी किंवा बंजर जमिनी वापस हडपण्याचा जास्त प्रयत्न केला नाही. अतिरिक्त जमिनी मात्र वापस घेण्याचा प्रयत्न केला. आंदोलनाने तेलंगाना मधील सामंती भूस्वामित्वची कंबर तोडली. परंतु हे कार्य निजामविरोधी भारताच्या एकीकरणासाठी मुक्ती संघर्षाच्या स्वरुपात आधीच झाले होते . त्यावेळी कम्युनिस्टांना मुलगामी शेतक–यांच्या मागण्या उचलून धरण्याची संधी प्राप्त झाली होतीकृत्यानंतरचे साहस खूप महागात पडले .त्यांना 'शेतकरी आंदोलनाच्या परिस्थितीची जाणीव दिसून येत नाही. खरे तर हा मार्ग पूर्णपणे चुकीच्या दिशेने चाललेल्या कांतिकारी कल्पनावादाचा परिणाम होता. ज्यावर काही भारतीय कम्युनिस्ट पूर्णपणे मोहित झालेले दिसत होते.

पटियाला मुजारा आंदोलनं – पटियाला हे पंजाबच्या संस्थानिकामध्ये सर्वात मोठे संस्थान होते. स्वातंत्र्य आंदोलनात ही सुरु असलेले 'शेतकरी आंदोलन येथे 19 व्या 'षतकात 'शवटी सुरु झाले होते. जामिनदारांना स्थानिक भाषेत येथे बिरुवेदार म्हटले जायचे. भारतीय स्वातंत्र्यानंतर पटियाला भारतीय संघराज्यात समाविष्ठ झाले परंतु जबाबदार सरकार बनविण्याच्या दिशेने कोणतेही पाऊल टाकले नाही. महाराजा सर्व राजकिय पक्षापासून वेगवेळे पडले त्यांनी मुजाराचे जबरदस्त 'शोषण सुरु केले.परिणामी प्रजा मंडलने शेतमजूरांच्या वतीने दिल्लीतील राज्यासंबंधी मंत्रालयाकडे तकार केली. जुलै 1948 मध्ये एका नविन राज्याची निर्मिति केली गेली. ज्याचे नांव पेप्सू (PEPSU)म्हणजेच पटियाला ॲंड ईस्ट पंजाव स्टेटस युनियन होते. यामुळे शोषण दडपशाही चे प्रमाण कमी झाले. या नविन राज्यात पंजाब मधील तत्कालिन राजे, संस्थानिक सामील होते.

परंतु नविन राज्य आपले अधिकार पूर्णपणे उपयोगात आणीत नव्हते यामुळे परिस्थिती गृहयुध्दा सारखी होत चालली होती. विरोधी वर्गाला किंवा राजकिय पक्षांना आपले प्रश्न स्वतः मिटविण्यासाठी सोडून दिले गेले. काही जमीनदार सशस्त्र टोळयांचा वापर करु लागले . एवढेच नव्हे तर प्रत्युत्तरासाठी सशस्त्र दल बनविण्याची वेळ आली. सशस्त्र स्वयंसेवक दलाची निर्मिती 1948 मध्ये तेजासिंह स्वतंतरच्या नेतृत्वात लाल कम्युनिस्ट पार्टी ने केली. हा गट पंजाबच्या कम्युनिस्टापासून वेगळा झाला होता ते किर्ती ग्रुपचे होते जे गदर आंदोलनातून निर्माण झाले होते. त्यांचा सी.पी. आय.सोबत तेव्हा चांगला संबंध नव्हता ; अशाप्रकारे 1948 पर्यंत सषस्त्र गटाची निर्मिती झाली. ज्यांचे काम होते मुजारा ना मदत करणे ज्याना बिस्वेदार आणि त्यांचे सशस्त्र दल त्रास देत होते.या सशस्त्र दलामुळे बिस्वेदारांवर अंकुश राहात होता. किशनगढ घटना 1949 मधून दिसूनयेते की हे सषस्त्र दल 30 ते 40 लोकांचे असत.



Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

1951 मध्ये नविन पूर्णपणे कॉंग्रेस सरकार निर्माण झाल्यानंतर परिस्थिती बदलली. मात वृषभान उपमुख्यमंत्री बनले आणि त्यांचा गट मजबूत होता. शेतीविषयी सूचना सल्ला देण्यासाठी एक कृषि सुधार शोध समिती बनविण्यात आली. कायदा निर्माण होईपर्यंत पेप्सू कास्तकारी कायदा जानेवारी 1952 मध्ये लागू करण्यात आला. यामध्ये कास्तकारांना जमिन बेद खली पासून संरक्षण प्रदान केले गेले. दरम्यान सार्वत्रिक निवडणूका झाल्या त्यामध्ये कॉंग्रेसला पेप्सूमध्ये बहुमत मिळाले नाही. महाराजा सरेवाला मंत्रीमंडळ कृषि कायदे करण्या अगोदरच गडगडले. राष्ट्रपति 'शासन लागू झाल्याने परिस्थिती मध्ये मोठा बदल झाला.राष्ट्रपतिंनी पेप्सू स्थायी कास्तकार मालकी अधिकार प्रदान करणे संबंधी कायदा 1953 लागू केला या कायद्याने कास्तकार जमिनीचे मालक झाले परंतु कम्युनिस्टांनी नविन कृषि कायदयाला विरोध करण्याचे मुख्य कारण बिस्वेदाराच्या जमिनी भरपाई देऊनही घेतली जात होती परिणामी कम्युनिस्ट 'शतक–यापासून वेगळे पडले संघटन मुजारा आंदोलनाचे त्यांचे पूर्वीचे सहकारी आणि प्रजा मंडलचे सहकारी कम्युनिस्ट, कॉंग्रेस गटाचे वृषभान आणि त्यांचे मित्र ही कम्युनिस्टापासून वेगळे जात होते अशाप्रकारे मुजारा आंदोलन 'शेतकरी कायद्याबाबत एक मार्गदर्शक आंदोलन होते.

नक्षलवादी 'शेतकरी आंदोलन नक्सलबारी

पश्चिम बंगालमध्ये 2 मार्च 1967 रोजी पहिल्यांदा गैर कॉंग्रेसी संयुक्त मोर्चा सरकार स्थापन झाले. यामध्ये सी.पी. आई. सी.पी. एम आणि कॉंग्रेस पासून वेगळा झालेला बांगला कॉंग्रेस समाविष्ट होते. या सरकारने जमिन सुधारणा लागू करण्याचा निश्चय केला . जमीन महसूल मंत्री सी.पी.एम. चे 'शेतकरी नेते हरे कृष्ण कोनार यांनी अतिरिक्त जमीनी भूमिहिनांना वाटण्याचा कार्यक्रमाची घोषणा केली. आणि सोबतच बरगादाराची जमिनी बेदाखिली समाप्त केली हे लागू करण्यासाठी 'शेतक–यांचे प्राथमिकता आणि संघटन उभारण्याचे आवाहन केले यामुळे गरीब 'शेतक– यांच्या अपेक्षा निर्माण झाल्या.तसेच अनेक छोटे आणि मध्यम जमीन मालकांत भिती निर्माण झाली की त्यांच्या जमीनी बरगादारांना दिल्या जातील. जमीनवाटपासंबंधी अनेक अडचणी होत्या.यामध्ये जास्त प्रमाणात कायदेशीर वाद होते. सरकार निर्माण केल्यानंतर सी.पी.एम. या वास्तवाला डोळ्यासमोरुन दूर करु षकत नव्हती. याशिवाय दाव्याची तपासणी विरोधी दाव्याचा हिशोब पटटा ;(महसूल) देण्याचे काम इत्यादी खूप वेळखाऊ काम होते ज्या विषयी सत्तेवर आल्यानंतरच सी.पी. एम. ला जाणीव झाली परंतु त्यांचे काही सहकारी हे सर्व शिकण्यासाठी तयार नव्हते यामध्ये नकसलबारी येथील गट पण होता.

1950 च्या दशकातच उत्तर बंगालच्या दार्जिलिंग जिल्हयाच्या नक्सलवादी क्षेत्रात कम्युनिस्टांनी शेतमजूर आणि चहाच्या मळयातील मजूर यांचे संघटन केले होते हे लोक जास्तीत जास्त संथाल ओराव आणि राजवंषी अधिवासी समुदायाचे होते. 'शेतमजूर जमीनमालकाकडे अधिया धोरणानुसार काम करीत होते हे जमीनमालक नांगर बैल आणि बी द्यायचे त्या बदल्यात पीक उत्पादनाचा एक हिस्सा प्राप्त करायचे. पीक हिस्स्याविषयी विवाद सामान्य गोष्ट होती बेदखली चे स्वरुप ही मोठया प्रमाणात होते हे प्रकार संयुक्त मोर्चा सरकार बनल्यानंतर वाढले.शेतमजूराना जमिनी दिल्या जातील ही भिती निर्माण झाली.चहाच्या मळयातील मजूर नेहमीच चहा मळा मालकाच्या धान्य जमिनीवर कास्तकार म्हणून काम करीत होते या धान्य पिकविणा–या जमिनी जमिन धारणा कायदयापासून वाचविण्यासाठी चहा मळयाच्या स्वरुपात नोंद केल्या जात. चारु मुजुमदार या प्रदेशातील एक महत्वपूर्ण नेता होते. भूमिसुधारणा कायद्याने लागू करण्यावर त्यांचा विषास नव्हता. जमिन. वर कब्जा करुन'शस्त्राच्या सहाय्याने त्याचे रक्षण करणे हेच राजकीय स्वरुपात अर्थपूर्ण आहे असे त्यांचे मत होते. आपल्या विचारांना ठोस स्वरुप देण्याकरीता चारु मुजुमदारने आपले सहकारी कानू संन्याल आणि आदिवासी नेता जंगल संथाल यांच्या सह एक षेतकरी संमेलन संयुक्त मोर्चा सरकार सत्तेवर आल्याच्या केवळ 16 दिवसानंतर दार्जिलिंग जिल्हयाच्या सिलिगुडी सब डिव्हीजन च्या सी.पी. एम.गटाद्वारा संघटित केले होते. संम्मेलनाने जमिनीवर जमीनदारांच्या एकाधिकाराची समाप्ती ,शेतकरी समितीच्या माध्यमातून जमीनचे वाटप तसेच केंद्र सरकार संयुक्त मोर्चा सरकार आणि जमिनदार यांच्याविरुध्द सषस्त्र संघर्षाचे आवाहन केले. काही दाव्यानुसार एप्रिल आणि मे 1967 मध्ये संपूर्ण गांवे संगठित केली गेली होती. गावामधील 'शेतकरी समित्या सशस्त्र सैनिकांचे केंद्र बनले त्यांनी जमिनी ताब्यात घेतल्या. जमिनी संबंधी दस्ताऐवज जाळले कर्ज माफ केली. काही कुप्रसिध्द जमीनदारांना मृत्युदंड दिले आणि एक समांतर प्रशासन स्थापन केले. धनुष्य बाण भाले याशिवाय जमीनदारांकडून हिसकावून घेतलेल्या बंदूका जमा करण्यात आले. नक्सलवादी पोलीस स्टेशन अंतर्गत हाटीगिशा, साडीबाडी, स्टेशन अंतर्गत बुरागंज आणि फांसी देवा पोलीस स्टेशन अंतर्गत चौपुखुरिया हे विद्रोहीचे केंद्र बनले.

सी.पी.एम नेत्यांना जाणवले की नक्सलवादी नेते'शेतक–यांना सरकार विरोधात आत्मघातकी संघर्षाकडे घेऊन जात आहे. विषेषतः सी.पी. एम. सरकारचा एक घटक पक्ष असताना सी.पी.एम. सत्तेवर राहून नक्सलवादी च्या सहका–याच्या कार्याला पाठिंबा देवू 'शकत नव्हते. सुरुवातीला त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला गेला. मंत्री हरेकृष्ण कोनार सिलिगुडी येथे गेले. त्यांनी पोलिस शोधत असलेल्या नेत्याना आत्मसमर्पणासाठी तयार केले. तसेच सर्व अनाधिकृत हालचाल बंद करण्यास व स्थानिक 'शेतकरी संघटनाच्या सल्ल्यानुसार जमिनीचे कायदेशिर वाटपासाठी सहकार्य करण्यास तयार असल्याचे वदवून घेतल्याचे त्यांचे मत होते.

परंतु स्थानिक नेत्यांनी अशा कोणत्याही सहमतीचे अमान्य केले दृसरकारद्वारा दमन केले जाईल या अपेक्षेने 'शेतक–यांना पोलिस विरोधात भडकावणे सुरु झाले. यानंतर पोलिसांवर हल्ले, प्रतिउत्तरादाखल पोलीस कारवाई इत्यादी प्रकार सुरु झाले. सी.पी.एम. ची परिस्थिती अवघड झाली. त्यांनी काळी काळ बंडखोरांचे समर्थन व पोलिस कारवाईचा मध्यला मार्ग निवडण्याचा प्रयत्न केला त्यांनी सरकारचे एक मंत्रीमंडळाचे प्रतिनिधी मंडळ पाठवून समझोता करण्याचा प्रयत्न केला काही स्त्रोतानुसार समजते की 'शेतकरी तडजोड करण्यास तयार होते परंतु चारु मुजूमदार ने त्यांना बाजूला केले . सी.पी.एम समोर दोन पर्याय होते. एक बंडखोर नेत्यांना पक्षातून हकालपट्टी करणे आणि दुसरा सरकारमधून राजीनामा देणे त्यांनी बंड खोर नेत्यांना बाहेर काढण्याचा निर्णय घेतला. याच्या उत्तरादाखल सर्व नरमपंथी शक्ती एकत्र आली. त्यांनी सर्वप्रथम नक्षलबारीच्या 'शेतक–यांच्या मदतीसाठी एक समिती निर्माण केली आणि नंतर कम्युनिस्ट पार्टी मार्क्सवादी (लेनिनवादी ) ची



Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - II)

या दरम्यान दडपशाहीचा परिणाम समोर आला. पुढे 1967 पर्यंत शेतकरी आंदोलन समाप्त झाले होते [illegible] अनेक नेते आणि कार्यकर्ते तुरुंगामध्ये बंद केले गेले. यानंतर नक्सल आंदोलन श्रीकाकुलम [illegible] याचे मुख्य 'शक्ति स्थळ हे नक्सल आंदोलन [illegible] भारतीय जनता नक्सली आणि सी.पी. एम. [illegible] [illegible] यांच्यामध्येच रस्त्यावरच्या लढाईचे रुप घेऊन राहिले. हे सर्व शेतकरी क्रांतीच्या सुवर्ण स्वप्नांच्या [illegible] दूर होते.

श्रीकाकुलम –आंध्रप्रदेश –

श्रीकाकुलम आंध्रप्रदेशाच्या उत्तरी भागातला ओरिसा राज्याला लागून असलेला सर्वात कमी विकसित असलेला जिल्हा होता. स्थानिक आदिवासींमध्ये दशकात पार्वतीपुरम ,पालाकोंडा , पटापटनम आणि कोतूर येथे काम करणा–या कम्युनिस्टांनी संघटीत केले होते. 1957–58 पासून 1967 पर्यंत झालेल्या आंदोलनात गिरिजन संघम आणि महिला संघम यांनी आदिवासियांना संघटीत केले आणि मोठे यश मिळविले ज्यात गैरआदिवासी सुभेदार आणि जमीनदारांनी अवैधपणे कब्जा केलेल्या जमिनी परत घेणे. मजदूरी मध्ये वाढ , जंगलातील उत्पादनांना चांगला दर, कर्ज कमी, घरबांधणी किंवा इतर आवश्यकतेसाठी जंगलात लाकूड घेण्यासाठी मुक्तप्रवश अशा मोठया सफलता मिळाल्या. याने आदिवासींचा आत्मविश्वास वाढला आणि ते शहरातील मोर्चामध्ये उत्साहाने भाग घेऊ लागले.

नक्सलवादी सारखे येथे सी.पी.एम. चे बंडखोर नेते पक्षावर नाराज होते त्यांनी सशस्त्र संघर्षाचा मार्ग निवडला नक्षलवादी ची प्रेरणा घेऊन पण त्याच्या अनुभवाची उपेक्षा करीत हे आंदोलन नक्सलवादी आंदोलन दडपून टाकल्यानंतर खूप काळानंतर सुरु झाले. नोव्हेंबर 1967 ला सुरु होऊन नोव्हेंबर 1968 ते फेब्रुवारी 1969 च्या काळात ते आपल्या परमोच्च बिंदू वर पोहोचले होते. धनुष्यबाण , दगड आणि कधी कधी देशी बंदुकाने सज्ज होऊन गिरीजन आपल्या कार्यकर्त्यांना पकडण्यासाठी आलेल्या पोलिसांना पिटाळून लावीत असत. कम्युनिस्ट कांतीकारी गावागावामध्ये जाऊन लोकांना ग्रामरक्षादल बनवण्याकरीता आवाहन करीत. एप्रिल 1969 मध्ये राष्ट्रीय स्तरावर एक नवीन कम्युनिस्ट पार्टी सी.पी.मार्क्स लेनिनवादी च्या निर्मितीनंतर आंदोलनाने नविन वळण घेतले. कार्याचा केंद्रबिंदू जनसंघर्षाऐवजी छापामार हालचाली आणि व्यक्तिगत हिंसा यावर केंद्रीत केले गेले. जमीनदार , नफेखोर , पोलीस , जगलाचे अधिकारी यांच्या हत्या करण्यात आल्या. नोव्हेंबर 1969 मध्ये हे आंदोलन दडपण्याच्या कामाला वेग आला. जानेवारी 1970 पर्यंत आंदोलनाचे अनेक नेते मारले गेले व अटकेत टाकले गेले. जून 1970 च्या मध्यात एक मोठे पोलीस अभियान राबविले गेले ज्यात 1400 लोकांना अटक झाली. 10 जुलै 1970 मध्ये को.वी.सत्यनारायण व आदि भटला कैलासम हे आंदोलकांचे दोन मोठे पुढारी मारले गेले आणि यानंतर हे आंदोलन समाप्त झाले. 1971 मध्ये काही माओवादी गटांनी या आंदोलनास पुर्नजिवीत करण्याचा प्रयत्न केला पण 1975 पर्यंत हे आंदोलन समाप्त झाले.

नवीन शेतकरी आंदोलन –

'शेतकरी आंदोलन राष्ट्रीय स्तरावर 1980 मध्ये झाले. महाराष्ट्राच्या नाशिक येथील 'षरद जोषीच्या षेतकरी संघटनेच्या नेतृत्वात रस्ता रोको व रेल रोको आंदोलन झाले. दोन लाख 'शेतक–यांनी नोव्हेंबर 1980 मध्ये मुंबई कलकत्ता व मुंबई दिल्ली चे रस्ते बंद केले. 'शेतक–यांनी कांदा व ऊसाचे दर वाढविण्याची मागणी केली. पोलीस गोळीबारात दोघांचा मृत्यु झाला आणि कांदा व ऊसाचे भाव पण वाढविण्यात आले.शरद जोशी या आंदोलनाचे नेतृत्व करीत होते. ते संयुक्त राष्ट्र संघटनेचे माजी अधिकारी होते. त्यांनी भारत विरुध्द इंडिया किंवा कृषि भारत विरुध्द औद्योगिक भारताचा नारा दिला.

1986 मध्ये उत्तर प्रदेशाच्या सिसौली गाव मुज्जफरनगर जिल्हयामध्ये महिंदरसिंग टिकैत यांचे नेतृत्व पुढे आले. त्यांनी विजेचे दर कमी करुन जुन्या स्तरावर आणण्याच्या मागणीची घोषणा केली. तामिलनाडू मध्ये विवसई संगम, कर्नाटकात रायथू संघ, पंजाब आणि उत्तर प्रदेषात भारतीय किसान युनियन ,गुजरात मध्ये खेडूत समाज आणि किसान संघ तसेच महाराष्ट्रात 'शेतकरी संघटनेने हजारो लाखो 'शेतक–यांना आंदोलनात उतरविले. विविध ठिकाणी विविध वेळेला, अनेक मागण्यासाठी त्यांनी रस्ते , रेल अडविली. 'शहरांना वस्तूंचा पुरवठा बंद केला. स्थानिक आणि प्रांतीक कार्यालय सरकारी कार्यालयाच्या समोर धरणे आंदोलेन केली. अधिका–यांना घेराव घातला. राजकिय नेत्यांना गावबंदी केली. वाढीव वीज बिलांची रक्कम देण्यास नकार दिला. कर्जावरील व्याज आणि सिंचनाच्या वाढीव किंमती देण्यास ही विरोध केला. कर्ज परतफेड वसुली करण्यास विरोध केला एवढेच नाही तर जप्त केलेले साहित्य आणि जमिनी परत मिळविल्या.

या आंदोलनांचे मुख्य कारण असा समज होता की सरकार कृषिचे दर कृत्रिम पध्दतीने कमी स्तरावर करते कारण 'शहरांना स्वस्तात धान्य आणि कच्चामाल पुरवठा करता यावा. परिणामी दरामध्ये विसंगतीमुळे''शेतकरी शेतीच्या कामाकरीता लागणा–या वस्तू औद्योगिक वस्तू जादा दराने घेऊ लागल्या. परंतु 'शेती उत्पादनासाठी शेतक–यांना कमी दर मिळू लागला याचा परिणाम असा झाला की शेतकरी 'शहराच्या स्वार्थासाठी 'शोषित होत राहिले. 'शेतक–यांना कर्जे किंवा आधारभूत सेवेसाठी खर्च वापस करण्याची आवष्यकता नव्हती कारण त्यांनी अगोदरच खूप किंमत मोजलेली असते. हा मूलभूत विचार अनेक नेते आणि संघटना वेगवेगळया रुपात सांगतात. हे 'शेतकरी आंदोलनाची वैधता सिध्द करतात. भारतीय 'शेतकरी परंपरांगत पध्दतीने सरकारच्या चुकीच्या मागणीच्या विरोधातच असतो.

नवीन शेतकरी आंदोलने 1980 च्या दशकात प्रसार माध्यमांचे ध्यान आकर्शित करतात. या आंदोलनाचा मुख्य भर 'शेती उत्पादनाच्यावर लाभकारी दर प्राप्त करणे , पाणी आणि वीज दर ,कांदा दर, कर्जाच्या अटी इत्यादी कमी करण्यावर होता. या कारणांसाठी प्रसार माध्यमावर आरोप केले गेले की ते मुख्यतः श्रीमंत शेतक–यांच्या मागण्यांचे साधन बनतात असे शेतकरी हरितकांती सह स्वातंत्र्यानंतरच्या विकास योजनांचा फायदा घेतात आणि गरीब ग्रामीण शेतक'–याविषयी त्यांना काहीच चिंता नाही परंतु आंदोलनाचे पुढारी या आरोपाचा खंबीरपणे विरोध करतात त्यांच्या मते आंदोलनास मध्यम आणि लहान 'शेतक–यांचामोठा पाठिंबा होता याशिवाय आंदोलन 'शेतमजूरांची मजूरी वाढविणे आणि महिला व दलितांच्या मागण्या पूर्ण करण्याची मागणी करीत होते. उदा. महाराष्ट्रातील 'शेतकरी संघटना परंतु वास्तव हे होते की 'शेतकरी संघटना व्यतिरिक्त इतर कोणतीही संघटना खरोखर 'शेतमजूर 'शेतकरी मालक यांचे प्रश्नाकरीता आवाज उठवलेली दिसत नाही.



Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

परंतु तरीही एक सत्य दिसून येतेकी, या आंदोलनाचा लोकांचा जनाधार व्यापक होता आणि काही टिकाकारांच्या दाव्यांच्या विपरित फक्त श्रीमंतापुरता मर्यादित नव्हता .

1981 मधील तामिळनाडू मधील 'शतकरी आंदोलन राज्य सरकारने दडपून टाकले, पंजावमध्ये 1984 मध्ये 'शेतक-यांनी 'शेती पिकांचे उत्पादन कमी करण्याचा निर्णय घेतला परंतु सुदैवाने या निर्णयाची अंमलवजावणी झाली नाही. या आंदोलनाना नवीन 'शतकरी आंदोलन म्हटले गेले याचे कारण की ही आंदोलने नवीन गैर वर्गीय किंवा परावर्गीय सामाजिक आंदोलनांचा भाग होते दुसरे कारण ही आंदोलने राजकिय पक्षाचाच एक भाग होते परंतु नंतर कालौघात काही प्रमाणात नवीन 'शतकरी आंदोलने सुध्दा राजकिय पक्षाशी संबंधित झाले. तामिळनाडू याचे पहिले उदाहरण देता येईल. कर्नाटक ,पंजाब महाराष्ट्रातील 'शतकरी संघटना इत्यादी उदाहरणे देता येतात.

वैचारिकतेच्या दृष्टीकोनातून ही नविन 'शतकरी आंदोलन विभागले गेले होते.शरद जोशी उदारीकरणाचे समर्थक होते. आंदोलनात संघटनात्मक विचारधारांची एकात्मता नव्हती. याशिवाय 1990 च्या दषकात आंदोलन ढिले पडून त्याचा जोर कमी झाला परंतु यात 'शंका नाही की या आंदोलनाने ग्रामीण भागात उपेक्षा आणि मागासलेपणावर लक्ष्य देऊन 'शेतक-यांच्या संवेदनाना स्पर्श केला परंतु 'शहरी आणि ग्रामीण 'शेतकरी यामधील संघर्ष ही या आंदोलनाने वाढला.

समारोप /निष्कर्ष–

स्वातंत्र्योत्तर भारतात 'शतकरी आंदोलने मोठया प्रमाणात झाली. नविन सामाजिक प्रश्न, समस्या या आंदोलनानी देशासमोर मांडल्या नवीन भारताच्या उभारणीत या आंदोलनांचे अनन्य साधारण महत्व आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये आहे. नविन 'शेती कायदे जमिनी संपादनाचे कायदे, शेतमजूर ,भाववाढ पिकांच्या आधारभूत किंमती ,शहरी ग्रामीण संघर्ष इत्यादी वर या आंदोलनांनी प्रकाश टाकल्याचे दिसून येते.

संदर्भ :–

1. ए.आर. देसाई (संपा)अग्रेरियन स्ट्रगल्स इन इंडिया आफ्टर इंडिपेंडस दिल्ली 1986.
2. पी. सुंदरैयया, तेलंगाना पीपल्स स्ट्रगल एंडइटस लेंसस कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया मार्किसस्ट कलकत्ता 1972.
3. मृदुला मुखर्जी कम्युनिस्टस ॲण्ड पीजेंट इन पंजाब ए फोकस ऑन मुजारा मुवमेंट इन पटियाला 1937:53, नई दिल्ली 1983.
4. बिपिनचंद्र (संपा)द इंडियन लेफ्ट किटिकल अपेजलस नई दिल्ली 1983.
5. मृदुला मुखर्जी पीजेंट रेजिस्टंस ॲण्ड पीजेंट कांशसनेस इन कलोनियल इंडिया : सब आल्टर्न्स ॲण्ड बियॉड ई.पी. डब्ल्यू 1988 (ऑक्टोंबर)
6. स्टाफन लिडबर्ग न्यू पफार्मर्स मुव्हमेंट इन इंडिया एज स्ट्रक्चरल रिस्पांन्स ॲण्ड कलेक्टिव्ह आयडेंटींटी फॉर्मेशन केस स्टडी ऑफ शतकरी संघटना ॲण्ड द बी.के. यू. टॉमब्रास (संपा) न्यू फार्मर्स मूव्हमेंट इन इंडिया इलपफोर्ड , 1995.
7. बिपिनचंद्र मृदुला मुखर्जी आदित्य मुखर्जी , आजादी के बाद का भारत दिल्ली विश्वविद्यालय 2002.

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner